# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६९ १२३३
२५६२ ११८८
२५६२ ११५७
२५६२ ११५९
२५६२ ११६१

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
**संकेतस्थळ** : www.unipune.ac.in
इ—मेल : affiliation@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र.: सीए/५२९ दिनांक :१४/०५/२०२१

प्रति,

**मा. अध्यक्ष/सचिव,**
अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,
लाल टाकी रोड, ता. अहमदनगर,
जि. अहमदनगर — ४१४ ००१

**विषय:** **'स्वायत्त दर्जा' प्रदान करण्याबाबत......**

संदर्भ: १) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.22-1/2017(AC), दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१

२) मा. प्राचार्य, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर —४१४ ००१ यांचे पत्र संदर्भ क्र.१४०८/२०२०—२१, दिनांक २२/०२/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयास आणि संदर्भीय पत्रांस अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या **अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर — ४१४ ००१** या संलग्न महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (द) आणि कलम १२२ (१) व महाराष्ट्र शासन राजपत्र/अधिसूचना, दिनांक १४ जानेवारी, २०१९ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि संचलित किंवा घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याबाबतची मानके) एकरूप परिनियम, २०१८ मधील तरतूदींच्या, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिसंस्था/नियामक मंडळ आणि भारत सरकार, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, परिनियम, आदेश, मार्गदर्शक तत्वे इ. च्या अधिन राहून, **शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ ते २०३०—२०३१ या दहा वर्षे कालावधीसाठी 'स्वायत्त दर्जा'** प्रदान करण्यात येत आहे.

पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २ (६१) अनुसार स्वायत्त महाविद्यालयातील अध्यापकांच्या नेमणुकीस विद्यापीठाची अध्यापक/शिक्षक मान्यता घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त महाविद्यालयाच्या स्वायत्त दर्जाची मुदत संपुष्टात येण्याच्या अगोदरच्या वर्षीच्या ३० सप्टेंबर पूर्वी आवश्यकतेनुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरणासंदर्भातील संलग्नताविषयक प्रस्ताव विद्यापीठास विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपला,

**(डॉ. प्रफुल्ल अ. पवार)**
**कुलसचिव**

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :</u>**

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
२. मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
३. मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
४. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
५. मा. सह संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
६. मा. प्राचार्य, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, लाल टाकी रोड, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर — ४१४ ००१
७. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
९. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०. उपकुलसचिव, छाननी व तालनीकरण कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
११. उपकुलसचिव, प्रमाणपत्र कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१२. उपकुलसचिव, समन्वय कक्ष परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१३. उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१४. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१५. उपकुलसचिव, अंतर्गत गुणवत्ता व सिद्धता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
१६. सहायक कुलसचिव, आरक्षण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१७. सहायक कुलसचिव; मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
१८. सहायक कुलसचिव, मा. प्र--कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
१९. कक्षाधिकारी, डाटा प्रोसेसिंग युनिट, प्रस्तुत विद्यापीठ